


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २३८ वा शनिवार दि १५ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये



# बिहारमध्ये भाजपला बंपर यश; आता दिल्लीत वेगवान हालचाली...

## मराठमोळ्या शिलेदाराकडे सर्वोच्च जबाबदारी?

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएनं दमदार कामगिरी केली आहे. एनडीएकडे २०० पेक्षा अधिक जागांवर आघाडी आहे. बिहारमध्ये महाराष्ट्राची पुनरावृत्ती होताना दिसत आहे. विरोधकांचा दारुण पराभव झाला आहे. विधानसभेत विरोधी पक्षनेता दिसेल की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. भाजपच्या दोन शिलेदारांनी बिहारमध्ये विरोधकांना अक्षरशः धुव्वा उडवला आहे. बिहारमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची जोडी सुपरहिट ठरली. मोदींनी त्यांच्या भाषणातून जंगलराजवरुन लालू प्रसाद यादव यांच्या राजदला




लक्ष्य केलं. केंद्र सरकारच्या योजना आणि राज्य सरकारनं निवडणूक लागण्याआधी पाडलेला घोषणांचा पाऊस एनडीएला दणदणीत यश देऊन गेला. भाजपच्या मिशन बिहारमध्ये दोन शिलेदारांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. भाजपचे रणनीतीकार विनोद तावडे आणि धर्मेंद्र प्रधान बिहार विजयानंतर चर्चेत आहेत. विनोद तावडे यांचं नाव महाराष्ट्राचा परिचित आहे. २०१४ मध्ये राज्यात भाजपचं सरकार आलं. त्यावेळी तावडे यांना कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आलं. डिग्री प्रकरणामुळे ते काहीसे वादात सापडले. पुढे २०१९ मध्ये त्यांचं तिकीट कापण्यात आलं. मराठा चेहरा, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची पार्श्वभूमी, पक्षनिष्ठा यामुळे तावडे मुख्यमंत्रिपदासाठी चर्चेत राहिले. त्यामुळेच २०१९ मध्ये त्यांचं तिकीट कापण्यात आल्याची चर्चा दबक्या आवाजात झाली. पक्षानं तिकीट कापूनही विनोद तावडे यांनी अजिबात खळखळ केली नाही. पक्षानं संघटनेत जबाबदारी दिली. तावडेंनी ती स्वीकारली आणि काम सुरु केलं. एनडीएनं बिहारमध्ये मिळवलेल्या दणदणीत विजयात राष्ट्रीय महासचिव असलेल्या विनोद तावडे यांचा महत्त्वाचा वाटा आहे. तावडे यांनी उमेदवार निवडीत महत्त्वाची भूमिका बजावली होती. निवडणूक प्रचाराची रणनीती आखण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला. लोकगायिका मैथिली ठाकूर यांच्या लोकप्रियतेचा होणारा फायदा लक्षात घेऊन तावडे यांनी तिचा भाजप प्रवेश घडवून आणला. दुसऱ्याच दिवशी तिला अलीनगरमधून तिकीट दिलं. बिहारमधील कामगिरीचं बक्षीस तावडे यांना लवकरच मिळू शकतं. राष्ट्रीय अध्यक्ष पदासाठी त्यांचं नाव चर्चेत आहे.

# बिहारच्या निकालाने महाराष्ट्रात हादरे! ठाकरेंच्या नेत्याने काँग्रेसला घेरलं, ती चूक सांगत चांगलंच सुनावलं

**वृत्तसंस्था/ छत्रपती संभाजीनगर**

बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने चुका केल्या आहेत. महाराष्ट्रातूनच काँग्रेसने शिकलं पाहिजे होतं. बिहारमध्ये मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून तेजस्वी यादव यांना घोषित करताना उशीर केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित केला असता तर वेगळे चित्र दिसलं असतं. आता तरी काँग्रेसने ही वृत्ती बदलली पाहिजे, असा हल्लाबोल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. बिहारमध्ये काँग्रेसच्या दारुण पराभवावर दानवे बोलत होते. नुकत्याच पार पडलेल्या बिहार निवडणुकीतील सर्व जागांवरील कल हाती आले आहेत. बिहार विधानसभेच्या २४३ जागांमध्ये आरजेडी-काँग्रेस आघाडीला दारुण पराभव पत्करावा लागला तर एनडीए ऐतिहासिक बहुमत मिळवण्याकडे मार्गक्रमण करत आहे. सध्याची परिस्थिती पाहता एनडीए २०७ तर महाआघाडी २९ जागांवर आघाडीवर आहे. या निकालानंतर महाराष्ट्रातून वेगवेगळ्या नेत्यांच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. यात बिहार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे



यांनी आपली भूमिका मांडली आहे. अंबादास दानवे म्हणाले की,बिहार निवडणुकीचे निकाल पाहता काँग्रेससह महाआघाडीला मोठा फटका बसला आहे. काँग्रेसने महाराष्ट्रासह बिहारमध्ये मोठ्या चुका केल्या आहेत. या चुकांमधून काँग्रेसने शिकायला हवं. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित केला असता तर वेगळं चित्र दिसलं असतं. बिहारमध्ये तेजस्वी यादव यांना चेहरा म्हणून घोषित करताना वेळ लावला, त्यामुळे नुकसान झालं. प्रत्येक निवडणुकीमध्ये काँग्रेस जागावाटप करताना मोठा वाटा मागते. मात्र विजयाचे गणित आलं की त्यांचा मोठा पराभव होतो. यामुळे काँग्रेससोबत इतर पक्षांचं देखील नुकसान होतं. काँग्रेसने ही वृत्ती बदलली पाहिजे, असा सल्ला देखील अंबादास दानवे यांनी दिला आहे. दरम्यान, महाराष्ट्र आणि बिहार निवडणुकीत वेगवेगळी परिस्थिती आहे. आम्ही महाविकास आघाडीसोबत राहण्यास इच्छुक आहोत. काँग्रेसने जागा वाटपाचा घोळ शेवटच्या दिवसापर्यंत येऊ नये. त्यामुळे निवडणुकीत उमेदवारांना कमी वेळ मिळतो. यातून नुकसान होत असतं, असंही अंबादास दानवे म्हणाले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ...गुंतणे हीच गुरुकिल्ली...



## संपादकीय लेख

आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात आनंद निर्माण करता येणे, हाच तुमच्या आयुष्यातील सर्वांत मोठा आनंद असायला हवा, अशा संस्कारात आम्ही वाढलो. त्या संस्कारांना अनुसरूनच वागण्याचा प्रयत्न मी आजवर करीत आलो. मी सन १९९४मध्ये एमबीबीएस झालो. नंतर बधिरीकरणशास्त्र या विषयात पुढचे शिक्षण घेतले. बधिरीकरण शास्त्र या विषयातील शिक्षणामुळे गेल्या पन्नास वर्षांत मी अनेकांना व्याधीमुक्त होण्यामध्ये मदत केली. त्यातील दीर्घ अनुभव मला बरेच काही शिकवून गेला. कोणत्याही कठीण प्रसंगाला धीराने, शांतपणे तोंड देण्याची कार्यशाळा म्हणजे ङ्गऑपरेशन थिएटरफ असते. सातत्याने तेथे काम केल्याचा मला वैयक्तिक आयुष्यात खूपच फायदा झाला. दिसामाजी काही तरी लिहावे, प्रसंगी अखंडित वाचित जावेफ, या संत रामदासांच्या उक्तीनुसार लहानपणापासून मला वाचन लिखाणाची अतिशय आवड होती. कॉलेजमध्ये असताना मी कविता लिहीत असे. प्रथम मी लहान मुलांसाठी कविता लिहील्या. सह्याद्री, केसरी, छावा आदी मासिकांत त्या प्रसिद्ध झाल्या. पुढे डॉक्टर झाल्यानंतर मी एका साप्ताहिकात नियमितपणे एक वर्ष वैद्यकीय लेख लिहिले. मुंबई आकाशवाणीवर विविध व्याधींवर, आजारांवर अनेक व्याख्याने दिली. पूर्वी आकाशवाणीवर दर रविवारी सकाळी ङ्गजीवनरेखाफ नावाचा कार्यक्रम सादर होत असे. त्याअंतर्गत ङ्गएड्सफ या विषयावर मी १३ प्रहसने लिहिली. आकाशवाणीवरील कलावंतांनी ती सादर केली. ती आवडल्याचे मला अनेकांचे फोन आले. आकाशवाणीवर स्वलिखित काव्यवाचनाचे कार्यक्रम केले. या सर्व गोष्टींमुळे मला अनेक मित्र मिळाले आणि आनंदाचे क्षणही! निरनिराळ्या आजारांवर सोप्या मराठीत कविता लिहिल्या. त्या कविता दिवाळी अंकात प्रसिद्ध झाल्या. नंतर ङ्गवैद्यकशास्त्र एक काव्यानुभवफ नावाचा कवितासंग्रह प्रसिद्ध केला. त्या कवितासंग्रहावर आधारित एक कार्यक्रम तयार केला. मेडिकल असोसिएशनचे वार्षिक समारंभ, महाविद्यालयीन मराठी मंडळांत, महिला मंडळ, वाचनालयांत या कार्यक्रमाचे अनेक प्रयोग केले. त्याला फार चांगला प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी फिरलो. नवीन मित्र मिळाले. या काळात माझे कवितालेखन सुरूच होते. काही वर्षांपूर्वी ङ्गतुमच्या मनातलं!फहा आणखी काव्यसंग्रह प्रकाशित केला. संधी मिळेल, तेथे आवर्जून काव्यवाचन करतो. माझ्या या छंदामुळे मला कंटाळा कधीच येत नाही. रिकामा वेळ असेल, तर वर्तमानपत्र, कादंबरी, कथासंग्रह, मेडिकल जर्नल यांपैकी काहीतरी वाचतो. आज कशावर कविता लिहिता येईल, याचा विचार करतो. अनेक तरुण ङ्गडॉक्टर झालो हा गाढवपणा झाला,फ असे म्हणतात; पण मला हे पटत नाही. उलट मी डॉक्टर झालो, म्हणून स्वत:ला नशीबवान समजतो. डॉक्टर झाल्यानंतर कदाचित भरपूर पैसे मिळणार नाहीत; पण आजारातून मुक्त झाल्यानंतर रुग्णांना मिळणारा आनंद देऊ शकतो, त्याचे मोल कशातही होत नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे एका अर्थाने डॉक्टर कधीच निवृत्त होत नाही. नीट पाहिल्यावर एक गोष्ट लक्षात येते; ती म्हणजे माणूस जेव्हा निवृत्त होतो, तेव्हाच प्रथम मनाने खचतो. मोकळा वेळ कसा घालवायचा हे कळत नाही. मग तो मनाने प्रथम म्हातारा होतो. नंतर शरीराने म्हातारा होतो. ही मानसिक आणि शारीरिक घसरण वेगाने होते. माझ्या संपर्कात येणाऱ्या सर्वांना मी कामात व्यग्र राहण्यास, कशात तरी गुंतून राहण्यास सांगतो. यामुळे त्यांचे मानसिक आरोग्य सुधारते. आनंदी राहण्याची ही गुरुकिल्ली आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# रवींद्र धंगेकरांना धक्का! 'त्या' प्रकरणात न बोलण्याचे आदेश, पुणे कोर्टात काय घडलं?

**पुणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे पुणे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर यांनी गेल्या काही महिन्यांपासून भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांवर सडकून टीका करण्याची मालिकाच सुरू केली आहे. सुरुवातीला गुंड निलेश घायवळ याच्याशी संबंध असल्याप्रकरणी त्यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या कार्यालयातील व्यक्ती असणाऱ्या समीर पाटील यांच्यावर निशाणा साधत समीर पाटील मार्फत निलेश घायवळ हा चंद्रकांत पाटलांसोबत संपर्कात असल्याची टीका केली होती. त्यानंतर जैन बोर्डिंग जमिनीच्या गैरव्यवहाराप्रकरणी रवींद्र धंगेकर यांनी भाजप नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर निशाणा साधला होता. मात्र आता सुसाट सुटलेल्या धंगेकरांना एका प्रकरणामध्ये न्यायालयानेच ब्रेक लावला असल्याचं बोललं जात आहे. चंद्रकांत पाटील यांचे निकटवर्तीय आणि




पुण्यातील व्यावसायिक समीर पाटील आणि गुंड निलेश घायवळ यांचे संबंध असल्याचा दावा रवींद्र धंगेकर यांनी केला होता. समीर पाटील यांच्यामार्फत निलेश घायवळ हा चंद्रकांत पाटील यांच्या संपर्कात असल्याचंही रवींद्र धंगेकर म्हणाले होते. या आरोपांनंतर समीर पाटील यांनी रवींद्र धंगेकर यांच्याविरोधात १४ ऑक्टोबर रोजी अब्रुनुकसानीची ५० कोटी रुपयांची नोटीस पाठवली होती. त्यानंतर समीर पाटील यांनी पुणे जिल्हा न्यायालयात फौजदारी मानहानीचा खटला आणि दिवाणी खटलाही दाखल केला आहे. या दाव्याची सुनावणी २७ ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे. या संदर्भातील सुनावणीमध्ये रवींद्र धंगेकर यांना पुणे सत्र न्यायालयाने दणका दिला आहे. हा खटला चालू असेपर्यंत समीर पाटलांविरुद्ध कोणतेही वक्तव्य नका अशा सूचना दिल्या आहेत. याबाबत समीर पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. येथून पुढे रवींद्र धंगेकर यांनी कोणाबाबतही बोलताना पुरावे न घेता स्वतःच्या प्रसिद्धीच्या हव्यासापोटी व राजकीय लाभासाठी वक्तव्य करू नयेत, तसेच आता सर्व पुणेकर रवींद्र धंगेकर या इसम ाच्या वक्तव्यावर विश्वास ठेवणार नाहीत, असं समीर पाटील म्हणाले आहेत. रवींद्र धंगेकर यांनी काही दिवसापूर्वी म झ्यावरती जे खोटारडे व खोडसाळपणाचे आरोप केले होते. या आरोपासंदर्भात मी विशेष दिवाणी न्यायालयात मानहानी व अब्रूनुकसान भरपाई बाबत दावा दाखल केला आहे. या दाव्यामध्ये माननीय न्यायालयाने रवींद्र धंगेकर यांच्याविरोधात आदेश पारित केले आहेत. विशेष दिवाणी न्यायाधीश माननीय के.आर.सिंगल यांनी हे आदेश ११ नोव्हेंबर २०२५ रोजी दिले आहेत. या आदेशात न्यायालयाने स्पष्ट निर्देश असे दिले आहेत. समीर पाटील यांच्याविरुद्ध कोणतेही बदनामीकारक वक्तव्य, टिपणी किंवा खोटी माहिती यापुढील काळात प्रसारित करता येणार नाही. याबाबत सक्त मनाई कोर्टाने केली आहे,' असं देखील समीर पाटील म्हणाले. दरम्यान, 'गेल्या अनेक दिवसापासून खोटे आरोप व अपमानकारक वक्तव्य करून म ाझी प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न रवींद्र धंगेकर यांनी केला होता. कोणताही खरा पुरावा नसताना जे खोटे व हेतूपुरसकार आरोप केलेले आहेत त्यासंदर्भात धंगेकर यांनी कोर्टात आपली भूमिका मांडावी. असं असतानाही त्यांनी ती भूमिका म ांडली नाही. एकही पुरावा रवींद्र धंगेकर विशेष दिवाणी न्यायालयासमोर मांडू शकले नाहीत. कोर्टामध्ये स्वतः हजरही राहू शकले नाहीत. सर्व बाजू विचारात घेऊन कोर्टाने माझ्या बाजूने हा अंतरिम आदेश दिला आहे,' असा दावा समीर पाटील यांनी केला आहे.

## भाजप खासदार कंगना रणौत गोत्यात ; देशद्रोहाचा खटला चालणार

**नवी दिल्ली :** हिमाचल प्रदेशच्या मंडी म तदारसंघाच्या खासदार आणि भाजप नेत्या कंगना रणौत अडचणीत आल्या आहेत. आग्रा न्यायालयात त्यांच्या विरोधात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली असून ती स्वीकारण्यात आलेली आहे. शेतकरी आणि स्वातंत्र्य सैनिकांविरोधातील कथित आक्षेपार्ह विधानाप्रकरणी दाखल करण्यात याचिकेवर आता पुन्हा सुनावणी सुरु झाली आहे. कंगना रणौत यांच्या विरोधात देशद्रोहाचा खटला चालवला जाणार आहे.राजीव गांधी बार असोसिएशनचे अध्यक्ष रमाशंकर शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ सप्टेंबर २०२४ रोजी आग्र्यातील एका स्थानिक न्यायालयात त्यांनी याचिका दाखल केली होती. कंगना रणौत यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये शेतकरी वर्गाचा अपमान केला आणि महात्मा गांधी यांच्यासह स्वातंत्र्य सैनिकांविरोधात विधानं केल्याचा आरोप रमाशंकर शर्मा यांनी केला होता. न्यायालयाकडून अनेकदा नोटिसा पाठवण्यात आल्यानंतरही कंगना रणौत किंवा त्यांच्या प्रतिनिधीनं कोणतंही उत्तर दिलं नाही. न्यायालयानं त्यांना स्वत:ची बाजू मांडण्याची आणखी एक संधी दिली होती. पण त्यावरही त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही.यानंतर ९ जानेवारी २०२५ रोजी न्यायालयानं आदेश जारी केला. याचिकाकर्त्याकडून दाखल करण्यात आलेली तक्रार आणि पुराव्यांच्या आधारे एक सविस्तर अहवाल तयार करण्याचे आदेश न्यायालयानं दिले.




## 'त्याला पकडा, पाहू कोण आहे तो..' ; उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सांगितलेल्या थरारक किश्श्याची चर्चा

**बारामती :** उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख अजित पवार हे त्यांच्या विविध वक्तव्यांमुळे नेहमी चर्चेत राहतात. त्यांची भाषणं सर्वदूर फेमस होतात. भाषणांमधील किस्सेही बऱ्याचवेळा गमतीदार असतात. दरम्यान, अजित पवारांनी त्यांच्याबद्दल घडलेला असाच एक खास किस्सा अलिकडेच उघड केला आहे.बारामतीत झालेल्या एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतःच्या ताफ्याशी संबंधित एक रोचक आणि थोडासा थरारक प्रसंग सांगितला. काही दिवसांपूर्वी त्यांच्या गाडीला एका वाहनचालकाने अचानक कट मारल्याचे त्यांनी भाषणादरम्यान उघड केले आहे.हा किस्सा सांगताना उपमुख्यमंत्री म्हणाले की 'आम्ही एका ठिकाणी जात होतो. अचानक एक व्यक्ती माझ्या गाडीसमोर आला आणि थेट कट मारून पुढे गेला. मी लगेच मागून त्याच्या गाडीचा पाठलाग करण्यास सांगितले, पण तो दुसऱ्या रस्त्याने वळून गेला', असा किस्सा अजित पवार यांनी सांगितला.त्यांनी पुढे सांगितले की, 'यानंतर मी तातडीने पोलिसांना निर्देश दिले त्याला पकडा, पाहू कोण आहे तो. पोलिसांनी काही वेळातच त्या वाहनचालकाला पकडले. चौकशीत त्याने सांगितले की, मी घाबरलो होतो, म्हणून थांबलो नाहीया घटनेच्या निमित्ताने अजित पवार यांनी पोलिसांना स्पष्ट सूचना दिल्या की, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. नियम मोडणाऱ्यांना शिक्षा झालीच पाहिजे. यावेळी त्यांनी नागरिकांनाही आवाहन केले की, वाहतुकीचे नियम पाळा, जबाबदारीने वाहनं चालवा आणि अपघात टाळा. बाराम तीतल्या कार्यक्रमातील या किस्स्याने उपस्थितांम ध्येही चांगलीच चर्चा रंगली.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज बारामतीतील राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे बारामती नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूम ीवर मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखती पार पडल्यानंतर अजित पवारांनी कार्यकर्त्यांचा एक छोटासा मेळावा घेतला. या मेळाव्यात नगराध्यक्ष पदाचे नाव घोषित करतील अशी अपेक्षा बारामतीकरांना होती, मात्र अजित पवारांनी त्यांची पवार शैली खेळी करत नाव गुलदस्त्यात ठेवलं आहे. त्यामुळे आता बारामतीतला नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोण असणार, हे स्पष्ट व्हायला आणखी वाट पाहावी लागणार आहे.

# फेक इन्स्टा अकाऊण्टवरुन महिलेच्या नावे चॅटिंग, तरुणाला भेटायला बोलावून... मनसे पदाधिकाऱ्यासह तिघांना अटक

**सातारा :** बनावट इन्स्टाग्राम अकाउंट तयार करुन महिलेच्या नावाने चॅटिंग सुरु केली. त्यानंतर फलटण येथील तरूणाला वीर धरण परिसरात बोलावून जबर मारहाण केल्याप्रकरणी खंडाळा मनसे तालुकाध्यक्ष आणि कथित युट्यूब पत्रकारासह तिघांना अटक करण्यात आली आहे. इरफान दिलावर शेख, विशाल महादेव जाधव (दोघेही रा. शिरवळ, ता. खंडाळा) आणि किरण प्रकाश मोरे (मूळ, रा. कर्नावड, ता. भोर, पुणे, सध्या रा. शिरवळ, ता. खंडाळा) अशी संशयितांची नावे आहेत.संशयितांमधील इरफान शेख हा मनसेचा खंडाळा तालुकाध्यक्ष असून विशाल जाधव याला सातारा जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलं होतं. किरण मोरे हा कथित युट्यूब पत्रकार होता. फलटण तालुक्यातील ३५ वर्षीय तरूणाशी बनावट इन्स्टाग्राम अकाऊंटवरून चॅटिंग करताना आरोपींनी महिला बोलत असल्याचे भासवले. २० ऑक्टोबर रोजी त्याला वीर धरण परिसरात भेटायला बोलावले. त्या ठिकाणी संशयितांनी तरुणाला त्याच्याच कारमध्ये घालून अपहरण केले. त्याला फायबर काठीने, हाताने, तोंडावर पाठीवर जबर मारहाण केली.जखमी तरूणाने शिरवळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी तिघांच्याही मुसक्या आवळल्या. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली. मनसेच्या खंडाळा तालुकाध्यक्षावर अपहरण, मारहाणीचा गुन्हा दाखल होताच एकच खळबळ उडाली. तसेच कथित युट्यूब पत्रकार किरण मोरे याच्या तडीपारीचा प्रस्ताव देखील काल (१२ नोव्हेंबर) मंजूर झाला आहे. त्याला पुणे आणि



सातारा जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचा आदेश वाईचे प्रांताधिकारी योगेश खरमाटे यांनी दिला आहे.किरण मोरे याच्यावर विनयभंग, जबर मारहाण, धमकी देणे तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये शिरवळ पोलीस ठाण्यात तीन गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने शिरवळ पोलिसांनी त्याच्या हद्दपारीचा प्रस्ताव तयार केला होता. त्यावर सुनावणी झाल्यानंतर त्याच्या तडीपारीचा आदेश पारित करण्यात आला आहे. फलटणचे डीवायएसपी विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली, शिरवळचे पोलीस निरीक्षक यशवंत नलवडे यांच्या प्रयत्नातून ही कारवाई झाली आहे.फोटो अनुक्रमे- मनसे खंडाळा तालुकाध्यक्ष इरफान शेख, कथित युट्यूब पत्रकार किरण मोरे आणि तडीपार गुंड विशाल जाधव

या संशयितांनी धमकी देऊन पैशांची मागणी केली असल्यास पीडितांनी शिरवळ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. तक्रारदाराचे नाव व पत्ता गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन शिरवळ पोलिसांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लग्नासाठी बनला बनावट आरपीएफ एएसआय; कल्याण रेल्वे स्थानकावर फुटलं बिंग


**ठाणे :** लहानपणापासून पोलिस होण्याची इच्छा होती, एक आरोपी मात्र पोलिस होऊ शकला नाही. कुठेही काम करुन स्वत:चा गुजारा करीत असताना वयोवृद्ध आई वडिलांना त्याने सांगितले मी पोलिस झालो आहे. पण कल्याण स्टेशनवर आरपीएफची वर्दी घालून फिरत असताना त्याला आरपीएफ आणि जीआरपी पोलिसांनी अटक केली आहे. अविनाश जाधव असे या तरुणाचे नाव असून तो धाराशीव जिल्हयातील भूम येथे राहणारा आहे.कल्याण रेल्वे स्टेशन नेहमी प्रवाशांनी गजबजलेले असते. बुधवारी प्रवासी ये जा करीत होते. आरपीएफ आणि जीआरपी पोलिस गस्त घालत होते. याच दरम्यान आरपीएफचा एक एएसआय स्टेशनवर फिरताना दिसून आला. आरपीएफच्या जवानांनी कल्याण स्टेशनवर फिरत असलेल्या या आरपीएफ अधिकाऱ्याला पाहून आश्चर्य चकित झाले. कल्याणमध्ये हा आरपीएफ अधिकारी कधी दिसलाच नाही.हा इतर ठिकाणचा आहे का? याची विचारपूस करण्यासाठी एका



आरपीएफ जवानाने त्याची विचारपूस केल्यानंतर त्याची बोबडीचं वळली. त्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली. हा आरपीएफ अधिकारीच नव्हता तर केवळ आरपीएफची वर्दी घातून तो फिरत होता. आरपीएफच्या जवानांनी त्याला पकडून जीआरपीच्या ताब्यात दिले. कल्याण जीआरपीचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक पंढरीनाथ कांदे यांनी या प्रकरणाचा तपास सुरु केला आहे. आरपीएफची वर्दी घालून वर्दीवर एएसआय वन स्टार अशी फित लावली होती. पकडण्यात आलेल्या तरुणाचे नाव अविनाश जाधव असे आहे. तो धाराशीव येथील भूमचा राहणारा आहे. त्याने एफवायबीए पर्यंतचे शिक्षण घेतले आहे. तो हॉटेलमध्ये साफ सफाईचे काम करुन त्याचा गुजारा करीत होता. गावी त्याचे आई वडिल असून ते शेती करतात. पोलीस बनण्याची क्रेझ आणि लग्न जमत नसल्याने त्याने हे धक्कादायक कृत्य केल्याचे कळते आहे. एवढच नाही, त्याच्या गावकऱ्यांनीही त्याचा आरपीएफ जवान म्हणून सत्कारही केला होता. लहानपणापासून पोलिसच्या वर्दीची क्रेझ असल्यामुळे तो कल्याणमध्ये आरपीएफची वर्दी घालून फिरत असताना आढळून आला. कल्याण जीआरपी आणि आरपीएफ पोलिसांनी त्याला अटक केली आहे. दरम्यान अविनाश याने आरपीएफची वर्दी घालून काही गैर कृत्य केल्याचे पोलिस तपासात अद्यापपर्यंत निष्पन्न झालेले नाही. परंतू या संदर्भात पोलिसांचा तपास सुरु आहे.

## २९ वर्षीय तरुणीच्या मृत्यूमुळे २ डॉक्टरांना अटक, संपूर्ण हॉस्पिटलला टाळं

**तिरूपथी :** आंध्र प्रदेशात मोठ्या प्रमणावर अवैध अवयव तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. राज्यभर पसरलेल्या या रॅकेटचा भांडाफोड एका २९ वर्षीय महिलेच्या मृत्यूनंतर झाला. पोलिसांनी या प्रकरणात १२ जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून, संबंधित रुग्णालयाला सील करण्यात आले आहे. विशाखापट्टणम जिल्ह्यातील आनंदपुरम मंडळातील बुड्ढापेलम गावातील एस. यमुना ही २९ वर्षीय महिला या जाळ्यात अडकली होती. तिला तब्बल ८ लाख रुपयांच्या मोबदल्यात मूत्रपिंड विकण्याचा सल्ला देण्यात आला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, यमुनेची शस्त्रक्रिया चित्तूर जिल्ह्यातील मदनपल्ले येथील ग्लोबल मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये करण्यात आली. विशेष म्हणजे, या रुग्णालयाला अवयव प्रत्यारोपण करण्याची परवानगीच नव्हती.या हॉस्पिटलचे संचालक डॉ. के. अविनाश आणि डॉ. बी. शश्वती यांच्यासह काही दलाल आणि सरकारी रुग्णालयातील कर्मचारी मिळून अवैध पद्धतीने अवयव प्रत्यारोपणाचे व्यवहार करत असल्याचा संशय आहे. या दोन्ही



डॉक्टरांसह सर्व आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.मदनपल्ले खख टाउन पोलिस स्टेशनचे निरीक्षक राजा रेड्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार, यमुना रविवारी हॉस्पिटलमध्ये दाखल झाली होती. तिचे मूत्रपिंड काढून गोव्यातील रंजन नायक या व्यक्तीला प्रत्यारोपण करण्यात आले. मात्र, सोमवारी सकाळी यमुनेची तब्येत अचानक बिघडली आणि तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी आणि दलालांनी घटनेचे पुरावे नष्ट करण्यासाठी यमुनेचा मृतदेह तिरुपती येथे हलवला, आणि तिच्या कुटुंबाला याबाबत काहीही माहिती दिली नाही. जेव्हा यमुनेचा लाइव्ह-इन पार्टनर सुरी बाबू याने मृतदेह मागितला, तेव्हा दलालांनी नकार दिला आणि दोन्ही बाजूंमध्ये तिरुपती येथे वाद झाला.

## गावकऱ्यांची विकृताला केली बेदम मारहाण

**बंगळुरू :** विकृत पुरुषाने २१ वर्षीय दिव्यांग मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाले आहे. ही घटना सोमवारी (१० नोव्हेंबर) घडली. त्या दिवशी पीडितेच्या भावाचे लग्न होते. घरातील सदस्य लग्नाला गेले असता, दिव्यांग असलेली मुलगी घरी एकटीच राहिली होती. आईने सकाळी आठच्या सुमारास घर लॉक करून विवेक नगर येथील चर्चेमध्ये लग्नसमारंभासाठी हजेरी लावली होती.सकाळी सुमारे ११ वाजता आई घरी परतली असता तिला घराचा दरवाजा आतून बंद दिसला. दरवाजा ठोठावूनही काही प्रतिसाद न मिळाल्याने तिने लॅचच्या चावीने दरवाजा उघडला आणि तिच्या डोळ्यासमोर तिची मुलगी कोपऱ्यात बसलेली होती, आणि ती पूर्णपणे नग्न अवस्थेत होती. घाबरलेल्या आईने मुलीकडे धाव घेतली आणि ती अशी का बसली आहे, हे विचारू लागली. तिच्या नजरेस एक पुरुष दिसला. तोही अर्धनग्न अवस्थेत होता. आईने तत्काळ त्याच्यावर झेप घेतली, पण आरोपीने तिथून पळ काढला. आईच्या आरडाओरडीनंतर शेजारी धावून आले.

## आईकडून सतत दुजाभाव, तरुण वकिलानं राहत्या घरी आयुष्य संपवलं

**सोलापूर :** सोलापूर शहरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका तरुण वकिलाने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल बुधवारी दुपारी घडली. सागर श्रीकांत मंद्रूपकर (वय ३२, रा. समर्थ सोसायटी, एसआरपीएफ कॅम्प, विजापूर रोड) असं मृत वकिलाचं नाव आहे. या घटनेनं सोलापूरमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ॲड. सागर मंद्रूपकर यांनी काल बुधवारी दुपारी आपल्या घराच्या पहिल्या मजल्यावर दोरीच्या साहाय्याने स्लॅबवरील लोखंडी हुकाला गळफास घेतला. काही वेळानंतर ही घटना घरच्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्यांना खाली उतरवून तात्काळ सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केलं. मात्र, तेव्हाच डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचं घोषित केलं. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास



पोलिस उपनिरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.घटनास्थळावर पोलिसांना एक सुसाईड नोट मिळाली आहे. त्या चिठ्ठीत सागर यांनी लिहिलं आहे की, 'आईकडून होणाऱ्या सततच्या दुजाभावामुळे मी आत्महत्या करत आहे. माझ्या आत्महत्येला ती जबाबदार आहे. माझ्या मृत्यूनंतर तिला कठोर शिक्षा करा.' या मजकुरावरून कौटुंबिक कारणांमुळे त्यांनी टोकाचं पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी ॲड. सागर मंद्रूपकर यांचा पोलिसांबरोबरही काही वाद झाला होता. हे प्रकरण सोलापूर बार असोसिएशनपर्यंत पोहोचलं होतं. त्या वादामुळे सागर मानसिक ताणाखाली होते का, याबाबत विविध चर्चा सुरू आहेत. पोलिसांनी या सर्व बाबींचा तपास सुरू केला असून आत्महत्येचं नेमकं कारण समोर येणं बाकी आहे. तरुण वकिलाने आत्महत्या केल्याने सोलापूरमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

## भावाच्या हत्येचा बदला घेण्यासाठी काल फील्डिंग, पिस्तुल काढताना धरलं

**सांगली :** सांगलीमधील मिरजेतील कुणाल बाली याच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित असलेला अजय भोसले सांगली जेलमधून पळाल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. काल कुणालचा भाऊ वंश याला सलीम पठाण याच्यावर हल्ल्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी पकडलं आहे. दुसऱ्या दिवशी वंशच्या भावाच्या हत्येतील संशयित जेलमधून पसार झाल्याचा योगायोग कसा घडला? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.सांगलीच्या मिरजमध्ये करण्यात आलेल्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित असणारा अजय भोसले या आरोपीने सांगली कारागृहातून पलायन केल्याची धक्कादायक घटना समोर आलीये. अजय भोसले हा सराईत गुन्हेगार असून त्याने सहा महिन्यांपूर्वी मिरजेत कुणाल बाली याची हत्या केली होती. या प्रकरणी तो कारागृहात होता. दरम्यान, आज सकाळी त्याने कारागृहातून पलायन केलं. त्याच्या मागावर सांगली पोलिसांची वेगवेगळी पथके रवाना करण्यात आलेत.दरम्यान, कुणाल बाली हत्या प्रकरणाबाबत न्यायालयात अद्याप सुनावणी सुरु झालेली नाही. तसेच भोसले याने जामीनासाठी अर्जही



केला नव्हता. मिरज सिव्हिलमधील कालच्या घटनेनंतर भोसले पळून गेल्यानं जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.दरम्यान, मिरजेतील निखिल कलगुटगी या तरुणाच्या खून प्रकरणातील आरोपी सलीम पठाण आणि चेतन कलगुडगीवर आज मिरजेच्या सिव्हिल हॉस्पिटल परिसरामध्ये खुनी हल्ल्याचा प्रयत्न झाला. पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेश गवळी यांच्या सतर्कतेमुळे हा अनर्थ टळला. पीएसआय दत्तात्रय पुजारी आणि हेड कॉन्स्टेबल राजेश गवळी यांनी हल्ल्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीला ताब्यात घेतलं आहे.या हल्लेखोरांकडून एक रिवॉल्वर आणि त्या परिसरातील एक कोयता जप्त करण्यात आला आहे. दरम्यान अन्य तीन हल्लेखोर त्या ठिकाणाहून पळून गेले असल्याचीही माहिती आहे. मात्र, या घटनेमुळे मिरजेत एकच खळबळ उडाली आहे.खून प्रकरणातील दोन आरोपी सलीम पठाण आणि चेतन कलगुडगी यांना वैद्यकीय चाचणीसाठी मिरजेच्या शासकीय रुग्णालयात आज आणण्यात आलं होते. त्यांना रुग्णालयात घेऊन जाताना एक जण संशयित त्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करत होता. पोलिसांना त्याच्यावर संशय आल्याने पोलिसांनी त्याला पकडलं आणि बाजूला घेतलं. त्याला ताब्यात घेतल्यानंतर दुसऱ्या बाजूला असलेले तिघे जण पळून गेले. हल्ल्याच्या प्रयत्नात असणाऱ्या आरोपीकडून एक रिवॉल्वर जप्त करण्यात आली आहे. तसेच त्या परिसरातील कोयता जप्त करण्यात आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अर्जुन तेंडुलकरसह मुंबई इंडियन्सने सात खेळाडूंना संघाबाहेर केलं, धोनीच्या लाडक्याचाही समावेश

**मुंबई :** आयपीएलच्या पुढच्या हंगामासाठी आता मुंबई इंडियन्सने चांगलीच कंबर कसलेली आहे. कारण मुंबई इंडियन्सने शार्दुल ठाकूरसह शेरफेन रदरफोर्डला आपल्या संघात दाखल केले आहे. पण त्याचबरोबर अर्जुन तेंडुलकरसह सात खेळाडूंना त्यांनी संघाबाहेर केलेले आहे. मुंबई इंडियन्सने कोणत्या खेळाडूंना संघाबाहेर केले आहे, याची यादी आता समोर आली आहे.मुंबई इंडियन्सने खझड २०२६ साठी आता संघात मोठे बदल केले आहेत. हार्दिक पंड्याला साथ देण्यासाठी आता शार्दुलला मुंबई इंडियन्सने संघात स्थान दिले आहे. पण शार्दुलला संघात घेताना मुंबई इंडियन्सने अर्जुन तेंडुलकरला लखनौ सुपर जायंट्स संघाला दिले आहे.

कारण खेळाडूंची देवाण घेवाण करत हा मोठा व्यवहार झाला आहे. पण तरीही मुंबई इंडियन्सला लखनौच्या संघाला दोन कोटी रुपये द्यावे लागले आहेत. त्याचबरोबर मुंबई इंडियन्सने एकूण आठ खेळाडूंना संघाबाहेर करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामध्ये महेंद्रसिंग धोनीच्या लाडक्या खेळाडूचाही समावेश करण्यात आलेला आहे.मुंबई इंडियन्सने आता धोनीचा लाडका खेळाडू असलेल्या दीपक




चहरला संघाबाहेर करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईच्या संघाने दीपक चहरला ९ कोटी आणि २५ लाख रुपये मोजत आपल्या ताफ्यात दाखल केले होते. पण दीपकला लौकिकाला साजेसा खेळ करता आला नाही. त्यामुळे त्याला मुंबई इंडियन्सने संघाबाहेर केले आहे. मुंबई इंडियन्सने ७५ लाख

## कोणत्या खेळाडूंना संघाबाहेर केले ?

बेव्हॉन जेकब्स (३० लाख),श्रीजीथ कृष्णन (३० लाख),राज अंगद बावा (३० लाख),दीपक चहर (९.२५ कोटी),रीस टोपली (७५ लाख), सत्यनारायण राजू (३० लाख),लिसाड विल्यम्स (७५ लाख).मुंबई इंडियन्सने आता आगामी आयपीएलच्या सीझनसाठी संघात मोठे बदल केले आहेत. या बदलांमुळे मुंबई इंडियन्सच्या संघाला किती फायदा होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

रुपये खर्च करत रीस टॉपली या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूलाही संघाबाहेर केले आहे. मुंबई इंडियन्सकडून सत्यनारायण राजू आणि राज अंगद बावा यांनाही संधी मिळाली होती. या दोघांना मुंबई इंडियन्सने प्रत्येकी ३० लाख रुपयांना संघात घेतले होते.

## शमीचं करिअर संपलं ? दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मालिकेपूर्वी गिलच्या विधानाची चर्चा




**कोलकाता :** भारतविरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात मालिका रंगणार आहे. भारत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० मालिका खेळणार आहे. आता उद्यापासून मालिकेला सुरुवात होणार आहे. पहिला कसोटी सामना हा कोलकत्तामध्ये रंगणार आहे. कोलकत्याच्या ईडन गार्डनमध्ये सामना रंगणार आहे. आता सामन्यापूर्वी कर्णधार डर्हीलारप त्र्झश्रश्र पत्रकार परिषदेत एक विधान केले त्याची जोरदार चर्चा रंगली आहेभारतीय कर्णधार गिलने कबूल केले की, 'फिरकी गोलंदाज आणि अतिरिक्त वेगवान गोलंदाज यांच्यातील निवड करणे हे आव्हानापेक्षा कमी नाही, परंतु शुक्रवारपासून येथे सुरू होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीसाठी भारत जेव्हा अंतिम इलेव्हन निवडेल तेव्हा तो घरच्या मैदानावर फिरकी गोलंदाजांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेकडे दुर्लक्ष करणार नाही.'वेगवान गोलंदाजी विभागात, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांचा समावेश ईडन गार्डन्स येथे अंतिम इलेव्हनमध्ये निश्चित आहे, तर आकाश दीप देखील अंतिम इलेव्हनमध्ये आहे. भारतीय कर्णधार म्हणाला की, 'सामन्याचा निकाल बदलण्यात फिरकी गोलंदाजांची भूमिका महत्त्वाची असते. हे जवळजवळ निश्चित झाले आहे. विकेट कालपेक्षा वेगळी दिसते. आम्ही उद्या सकाळी ते पाहू आणि नंतर फिरकी संयोजनाचा निर्णय घेऊ, कारण फिरकी गोलंदाज साम न्याचा निकाल मोठ्या प्रमाणात ठरवतील. गिलने वॉशिंग्टन, जडेजा आणि अक्षर यांच्या फलंदाजी योगदानाबद्दल देखील सांगितले.भाराताकडे रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि कुलदीप यादव हे चार फिरकी गोलंदाज आहेत. जडेजा, अक्षर आणि वॉशिंग्टन हे देखील बॅटने चांगली कामगिरी करत आहेत. गुरुवारी झालेल्या सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत गिल म्हणाले, 'हे नेहमीच घडते. जर तुम्ही अतिरिक्त वेगवान गोलंदाज किंवा फिरकी गोलंदाजाला मैदानात उतरवले तर नेहमीच संघर्ष असतो. म्हणून आम्ही उद्या परिस्थितीचे मूल्यांकन करू आणि अंतिम ११ खेळाडूंवर निर्णय घेऊ.'

बंगालसाठी रणजी ट्रॉफी साम न्यांमध्ये अनुभवी वेगवान गोलंदाजने प्रभावी कामगिरी केली असूनही, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेसाठी मोहम्मद शमीला संघातून वगळण्याबद्दल बरीच चर्चा झाली.

## इस्लामाबादमधील स्फोटानंतर पाकिस्तानवर कारवाई

**नवी दिल्ली :** पाकिस्तानच्या संघावर आता आयसीसीने कडक कारवाई केली आहे. इस्लामाबाद येथे स्फोट झाला आणि त्यानंतर आयसीसीने पाकिस्तानच्या संघाची मोठी चूक दाखवून दिली. त्यानंतर पाकिस्तानचा कर्णधार शाहीन आफ्रिदीने आपली चूकही मान्य केली आहे.इस्लामाबाद येथे काही दिवसांपूर्वीच आत्मघातकी स्फोट झाला होता. त्यानंतर पाकिस्तानच्या दौऱ्यावर असलेले श्रीलंकेचे खेळाडू चांगलेच घाबरलेले होते. यापूर्वीही २००९ साली जेव्हा श्रीलंकेचा संघ पाकिस्तानच्या दौऱ्यावर आला होता, तेव्हाही त्यांना असाच अनुभव आला होता. त्यामुळे श्रीलंकेचे खेळाडू पाकिस्तानबरोबर क्रिकेटचा सामना खेळण्यास तयार नव्हते. पण या स्फोटानंतर दोन दिवसांनी कसा बसा सामना उकरण्यात आला. पण त्यानंतरही श्रीलंकेचे खेळाडू हे दुसरा सामना खेळण्यासाठी तयार नव्हते. पण पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळाने त्यांना सुरक्षेची हमी दिली आणि त्यामुळे श्रीलंकेचे खेळाडू क्रिकेटचा सामना खेळण्यात तयार झाले. पण आता पाकिस्तानवर आयसीसीने कडक कारवाई केली आहे.पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यात इस्लामाबाद येथील स्फोटानंतर पहिला सामना खेळवण्यात आला होता. या सामन्यात पाकिस्तानच्या खेळाडूंची कुर्मगती पाहायला मिळाली. कारण या पहिल्या वनडे सामन्यात पाकिस्तानचा संघ हा निर्धारीत वेळेपेक्षा चार षटके उशिरा टाकत होता आणि त्याचा सामन्यावर परीणाम झाला. पाकिस्तानच्या संघाकडून ही चूक घडली. ही चूक आयसीसीने पाकिस्तानचा कर्णधार शाहीन आफ्रिदीला सांगितली. शाहीन आफ्रिदीने आपली ही चूक मान्य केली. त्यानंतर आयसीसीने पाकिस्तानच्या संघावर कारवाई केली आहे. आयसीसीने आता पाकिस्तानच्या संघातील प्रत्येक खेळाडूवर सामन्याच्या मानधनाचा २० टक्के एवढा मोठा दंड आकारला आहे. आयसीसीकडून ही मोठी कारवाई असल्याचे म्हटले जात आहे. पाकिस्तानमध्ये स्फोट झाल्यानंतर तेथील सुरक्षेचे वाभाडे समोर आले होते. हा स्फोट एवढा भयंकर होता की, त्यामुळे संपूर्ण देशाला हादरा बसला. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे श्रीलंकेचा संघ असतानाना हा हल्ला घडला. त्यामुळे श्रीलंकेचे खेळाडू भयभीत झाले आणि त्यांनी न खेळण्याचा निर्णय घेतला होता. पण श्रीलंकेच्या क्रिकेट मंडळामुळे त्यांना ही मालिका आता खेळावी लागत आहे.

## वॉर्निंगनंतर रोहित शर्मा मुंबईकडून खेळू शकतो

**मुंबई :** बीसीसीआयने रोहित शर्माला वॉर्निंग दिली आणि त्यानंतर त्याने एक मोठा निर्णय घेतला. रोहित शर्माने आता स्थानिक क्रिकेट खेळायचा निर्णय घेतला असल्याचे म्हटले जात आहे. पण जर रोहितला स्थानिक क्रिकेट खेळायचे असेल तर त्याला एक महत्वाची गोष्ट करावी लागेल. ही गोष्ट केल्याशिवाय त्याला स्थानिक क्रिकेट खेळता येणार नाही. त्यामुळे रोहितला आता काय करावे लागणार आहे, हे समोर आले आहे.राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी भारताच्या सर्वच खेळाडूंनी देशांतर्गत स्पर्धेत खेळावे यासाठी आग्रह धरला आहे. रणजी करंडक स्पर्धेनंतर आता मर्यादीत षटकांच्या देशांतर्गत स्पर्धा सुरु होतील. रोहित शर्माने विजय हजारे वनडे क्रिकेट स्पर्धेत खेळण्याची तयारी दाखवली असल्याचे सांगितले जाते. मात्र मुंबई क्रिकेट संघटनेस तसेच मुंबईच्या निवड समिती सदस्यांसह त्याने अद्याप संपर्क साधलेला नाही.आम्हाला रोहित शर्माने अद्याप काहीही कळवलेले नाही. तो मुंबईकडून खेळला तर चांगलेच



होईल. विजय हजारे स्पर्धेच्यावेळी मुंबईचे काही प्रमुख खेळाडू नसण्याची शक्यता आहे. रोहित खेळल्यास त्याचा मुंबई संघास फायदाच होईल. वरिष्ठ खेळाडूंच्या सहभागाबाबत बीसीसीआय, अजित आगरकर (राष्ट्रीय निवड समिती अध्यक्ष) आणि गौतम गंभीर (राष्ट्रीय प्रशिक्षक) यांनी घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे', असे मुंबईच्या निवड समितीचे अध्यक्ष संजय पाटील यांनी सांगितले. दरम्यान, मुंबई क्रिकेट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनीही रोहित शर्माने अद्याप काहीही कळवलेले नाही असे सांगितले.मर्यादित षटकांचा देशांतर्गत मोसम मुश्ताक अली टी-२० स्पर्धेने सुरू होईल. त्या स्पर्धेसाठी मुंबई संघाची निवड पुढील आठवड्यात होणार आहे. या स्पर्धेत रोहित खेळण्याची शक्यता कमी आहे. विजय हजारे वनडे स्पर्धा २४ डिसेंबर ते ८ जानेवारी दरम्यान आहे. या स्पर्धेत मुंबईचा समावेश क गटात आहे. या गटात सिक्कीम, उत्तराखंड, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि गोवा यांचा समावेश आहे. भारत आणि न्यूझीलंड वनडे मालिका ११ जानेवारीपासून आहे.

# इमरान-यामीचा 'हक' चित्रपट विवादात!

**मुंबई :** अभिनेता इमरान हाशमी आणि यामी गौतम चा 'हक' चित्रपटाविरोधात शाह बानो यांच्या मुलीने कायदेशीर नोटीस पाठवली आहे. निर्मात्यांनी विना परवानगी चित्रपट बनवल्याचा आरोप तिने केला आहे.

बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता इमरान हाशमी आणि अभिनेत्री यामी गौतम यांचा आगामी चित्रपट 'हक' सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. शाह बानो प्रकरणावर आधारित असल्याचं म्हटलं जाणाऱ्या या चित्रपटावर आता शाह बानो यांच्या मुलीनेच कायदेशीर नोटीस पाठवली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शाह बानोच्या मुलीने चित्रपट निर्मात्यांवर विना परवानगी त्यांच्या कुटुंबाच्या कथेनुसार चित्रपट तयार केल्याचा आरोप केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार, 'हक' या चित्रपटात त्यांच्या आईच्या खऱ्या आयुष्यावर आधारित काही घटनांचा वापर करण्यात आला आहे, पण यासाठी त्यांची संमती घेतलेली नाही. इमरान-यामी गौतमचा आगामी चित्रपट 'हक'ची





कहाणी शाह बानोशी प्रेरित आहे. शाह बानो बेगम यांच्या मुलीने सिद्दीका बेगमने चित्रपट निर्माता आणि सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनला लीगल नोटीस पाठवली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, नोटिसमध्ये चित्रपटाचे रिलीज, प्रमोशन आण स्क्रीनिंगवर स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, हा देखील आरोप लावण्यात आला आहे की, शाह बानो यांच्या वैयक्तिक आयुष्याविषयी दाखवण्यात आले आहे. आणि त्यासाठी त्यांच्या कुटुंबीयाची परवानगी घेण्यात आलेली नाही. सिद्दीका बेगमने तौसीफ जेड वारसी द्वारा चार पार्टीजना नोटीस पाठवलीय. डायरेक्टर सुपर्ण वर्मा, प्रोडक्शन पार्टनर जंगली पिक्चर्स, बावेजा स्टुडियोज, सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन इ. 'हक' चित्रपटाचं दिग्दर्शन सपुर्ण वर्माने केलं आहे. यामध्ये इमरान हाशमी आणि यामी गौतम महत्त्वाच्या भूमिका साकारत आहेत. चित्रपटाचे पोस्टर आणि पहिला लूक नुकतेच प्रदर्शित झाले होते आणि त्यानंतरच या वादाची ठिणगी पडली. हा चित्रपट ७ नोव्हेंबरला चित्रपटगृहात रिलीज होणार आहे. यामी गौतम शाह बानोच्या भूमिकेत असेल. सध्या या नोटिशीवर निर्मात्यांकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. सूत्रांनुसार, 'हक' हा चित्रपट थेट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करण्याचा विचार केला जात आहे.

# सिनेमात बीफ बिर्याणी खातानाचा सीन; सेन्सॉरचा विरोध

**मुंबई :** सिनेमे आणि वाद हे समीकरण नवीन नाही. एखाद्या सिनेमाबाबत वाद कधी कलाकारांसंदर्भात असतो, कधी सिनेमाच्या कथेसंदर्भात असतो तर कधी सिनेमातील एखाद्या सीनबाबतचा असतो. असाच एका सिनेमाबाबतचा वाद उफाळून आला आहे. शेन निगमचा आगामी रोमँटिक ड्रामा 'हाल' सेन्सॉरच्या कात्रीत सापडला आहे. सेन्सॉरने या सिनेमात १५ दृश्यांना कात्री लावली आहे. या दृश्यात संबंधित कलाकार बीफ बिर्याणी खाताना दाखवले आहेत. सेन्सॉरच्या या आक्षेपामुळे 'हाल'चा रिलीज अडचणीत आला आहे.



सिनेमाच्या पीआरओनुसार बोर्डाने निर्मात्यांना १५ सीन हटवण्यास सांगितले आहेत. ज्यामध्ये 'ध्वजा प्रणाम', 'संघम कवल उंड', आणि बीफ बिर्याणी खातानाच्या दृश्यांचा समावेश आहे.

अबोर्डाच्या निर्णयावर निर्मात्यानी नाराजी व्यक्त केली आहे. याशिवाय सिनेमामध्ये असे कोणतेही दृश्य असल्याचा इन्कार केला आहे. असा कोणता सीन असल्याचा निर्मात्यांचा समज असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

सिनेमातील कट जर सेन्सॉरच्या म्हणण्यानुसार केले गेले तर सिनेमाला बोर्डाकडून अ प्रमाणपत्र मिळू शकते. १० सप्टेंबरला सेन्सॉर बोर्डासाठी सिनेमाचा शोही आयोजित केला होता.

यापूर्वी निर्मात्यांनी दुसरा सिनेमा बलतीसोबत टक्कर होऊ नये म्हणून हा सिनेमा पुढे ढकलला गेला होता. सिनेमा रिलीज होण्यासाठी १५ कट करण्याचे निर्मात्यांची इच्छा दिसत नाही. उलट त्यांनी या सिनेमात असा काही सीन नसल्याचे सांगितले आहे. या निर्णयांविरोधात त्यांनी उच्च न्यायालयात अपील केली आहे.



# मकामाचे तास आणि वेतनाबद्दलचे प्रश्न फक्त महिलांनाच का?

## काम करण्याच्या मागणीवर दीपिकाने सोडलं मौन

**मुंबई : अभिनेत्री दीपिका पादुकोण हे हिंदी सिनेविश्वातील आघाडीची नायिका आहे. 'ओम शांती ओम' सारख्या चित्रपटातून इंडस्ट्रीत पदार्पण करत दीपिकाने इंडस्ट्रीत स्वत चं स्थान निर्माण केलं आहे. आजवर तिने साकारलेल्या प्रत्येक भूमिकेचं कौतुक झालं. 'ओम शांती ओम', 'बाजीराव मस्तानी', 'पद्मावत', 'पिकू', 'ये जवानी है दिवानी', 'हॅप्पी न्यू इयर', 'पठाण' यांसारख्या चित्रपटांमध्ये तिने दमदार भूमिका साकारल्या आहेत. दरम्यान, मागील काही दिवसांपासून दीपिका पादुकोण आठ तासांच्या कामाच्या मागणीमुळे सात्यत्याने चर्चेत येत आहे. अशातच नुकतीच दीपिकाने एका कार्यक्रमात सध्या इंडस्ट्रीत सुरु असलेल्या चर्चांवर भाष्य करत आपली प्रतिक्रिया दिली आहे.**

काही महिन्यांपूर्वी अभिनेत्री दीपिका पादुकोण हिनं आठ तासांच्या शिफ्टमध्येच काम करणार असल्याचं स्पष्ट केलं. पण तिच्या या मागणीनंतर बॉलिवूडसह मराठी मनोरंजनविश्वातही चर्चा सुरू झाली. त्यात अलिकडेच जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने दीपिका पादुकोणने मध्य प्रदेशला भेट दिली. यावेळी त्यांच्या 'Live Love Laugh' या फाउंडेशनच्या दहा वर्षांच्या प्रवासाचा विशेष टप्पा साजरा करण्यात आला. ही संस्था गेल्या दशकभरात भारतात मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता आणि समर्थन यासाठी महत्त्वपूर्ण काम करत आहे. याचदरम्यान, दीपिका पादुकोणला प्रश्न विचारण्यात आला की,ज्ञतुम्ही जसं न्याय मागता, त्यासाठी कधी तुम्हाला किंमत मोजावी लागली का? या प्रश्नाचं दीपिकाने एका अतिशय विचारपूर्वक आणि प्रगल्भ उत्तराने प्रत्युत्तर दिलं.'मी अनेक स्तरांवर काम केलं आहे, हे माझ्यासाठी नवीन नाही. मला अगदी मानधनासारख्या गोष्टींच्या बाबतीतही जे काही अनुभव माझ्या वाट्याला आले त्याला तोंड द्यावं लागलं. याला नक्की काय म्हणावं हे मला माहीत नाही, पण मी अशी व्यक्ती आहे जी नेहमी आपल्या लढाया शांतपणे लढते. शिवाय काही कारणांमुळे कधीकधी तो चर्चेचा विषय बनवला जातो.ज्याबद्दल मला काही कल्पनाही नसते.पण, माझ्या लढाया शांततेत आणि सन्मानानं लढणं, हेच मला योग्य वाटतं.'

दीपिकाने यादरम्यान, तिच्या वैयक्तिक प्रवासाचा नव्हे, तर व्यवसायिक आयुष्यातील समानता, न्याय आणि आत्मसन्मान यासारख्या मोठ्या मुद्द्यांचाही वेध घेतला आहे. दीपिका तिच्या स्वभावाला साजेसं काम, पडद्यावर आणि पडद्याच्या बाहेर शांततेने, धैर्याने आणि प्रामाणिकपणे करत राहते, असंही तिने या कार्यक्रमात म्हटलं.

दरम्यान, दीपिका पादुकोणने गरोदर असताना कामातून ब्रेक घेतला होता. त्यानंतर ती संदीप रेडी वांगा यांच्या बहुचर्तित स्पिरिट मधून एक्झिट घेतल्याने तिची सर्वत्र चर्चा झाली. या कार्यक्रमात दीपिकाने दिलेल्या उत्तराने अनेकांची मनं जिंकली आहेत. दीपिकाच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, लवकरच ती शाहरुख खानसोबत 'किंग' चित्रपटात दिसणार आहे.

# महाराष्ट्रातील खाजगी प्रसूती रुग्णालयांसाठी आरोग्य विभागाचा लक्ष्य-मान्यता उपक्रम...

## मातामृत्यू कमी करण्यासाठी आणि आदरयुक्त प्रसूती सेवांसाठी राज्य शासन व यांचा संयुक्त प्रयत्न

**जनसंचलन/बुलढाणा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने राज्यातील खाजगी प्रसूती रुग्णालयांमध्ये सेवा गुणवत्ता वाढवून प्रसूतीदरम्यान होणाऱ्या मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने लक्ष्य-मान्यता हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. हा उपक्रम राज्यातील सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये दर्जात्मक, सुरक्षित आणि आदरयुक्त प्रसूती सेवासुनिश्चित करण्यासाठी राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राने मागील काही वर्षांत मातामृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय प्रगती केली असून, आता हा प्रयत्न खाजगी क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्यात आला आहे. लक्ष्य-मान्यता कार्यक्रमाचा मुख्य हेतू म्हणजे प्रसूतीदरम्यान माता आणि नवजात बालकांचे मृत्यूदर कमी करणे, खाजगी रुग्णालयांमधील सेवा गुणवत्ता, रुग्ण सुरक्षा आणि रुग्ण काळजीत सुधारणा करणे, प्रत्येक महिलेला सुरक्षित व आदरयुक्त प्रसूती अनुभव मिळवून देणे. हा उपक्रम महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया आणि या आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. संस्थेमार्फत फॉग्सी आणि खाजगी रुग्णालयांना आवश्यक तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण आणि मूल्यांकन सहाय्य पुरविले जाणार आहे. या कार्यक्रमांतर्गत खाजगी प्रसूती रुग्णालयांना २६ मानकांवर आधारित प्रशिक्षण व मूल्यांकन दिले जाईल. ही मानके फॉग्सी आणि आरोग्य विभागाच्या तज्ञांच्या सहकार्याने तयार करण्यात आली असून, त्यामध्ये पुढील चार प्रमुख घटकांचा समावेश आहे

१. पायाभूत सुविधा आणि यंत्रणा मजबुतीकरण
२. साधनांची उपलब्धता व वापर
३. क्लिनिकल कौशल्ये आणि उपचार क्षमता
४. नोंद व अहवाल प्रणाली यापैकी १६ मानके क्लिनिकल काळजीशी संबंधित असून, १० मानके आरोग्य संस्थात्मक व्यवस्थापनाशी निगडीत आहेत.

खाजगी प्रसूती रुग्णालयांतील कर्मचाऱ्यांना सेवा गुणवत्ता, सुरक्षितता आणि काळजी याबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले जाईल.या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील स्किल लॅब, रूम आणि प्रशिक्षण हॉल यांचा वापर करण्यात येईल. प्रशिक्षणादरम्यान लागू असलेले शासकीय शुल्क संबंधित संस्थांकडून अदा केले जाईल. प्रशिक्षण व कार्यक्रमासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे.मूल्यांकनासाठी राज्यस्तरीय मूल्यांकनकर्ता उपलब्ध करून देणे. जिल्हा स्तरावर फॉग्सी सोसायटीसोबत नियमित आढावा बैठकांचे आयोजन करणे. याची जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक यांची असेल. राज्यातील खाजगी प्रसूती रुग्णालयांमध्ये दर्जात्मक व सुरक्षित प्रसूती सेवा उपलब्ध होतील. महिलांना प्रसूतीदरम्यान आदरयुक्त व सन्मानपूर्वक देखभाल मिळेल. आरोग्यसेवेतील विश्वास, पारदर्शकता आणि गुणवत्ता वाढेल. मातामृत्यू व बालमृत्यू दरात घट होऊन महाराष्ट्रातील आरोग्य निर्देशांकात सकारात्मक बदल घडेल. लक्ष्य-मान्यता हा उपक्रम महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्रातील एक महत्वपूर्ण टप्पा मानला जात असून, सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचा संयुक्त सहभाग हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आहे. या उपक्रमामुळे राज्यातील खाजगी रुग्णालयांमध्ये सेवेचा दर्जा आणि मातृत्व आरोग्याचे परिणाम दोन्ही सुधारतील, असा विश्वास आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालय येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालक दिन साजरा....

**जनसंचलन/बुलढाणा**



जिल्हा सामान्य रुग्णालय येथे आज १४ नोव्हेंबर रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालक दिन साजरा करण्यात आला. जिल्हा सामान्य रुग्णालय बुलडाणा येथील बाल रुग्णकक्ष (:५) मध्ये तसेच विभागा मध्ये बालकदिन साजरा करण्यात आला आहे. याप्रसंगी अध्यक्षस्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार सर होते तर प्रमुख पाहुणे डॉ. कैलास झिने (अधिष्ठाता) वैद्यकिय महाविद्यालय बुलडाणा तसेच अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ भुसारी सर, मुख्य प्रशासकिय अधिकारी डॉ. सचिन बळ्कुंदे,जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. प्रशांत पाटील, तसेच डॉ सचिन वासेकर,डॉ बेदमुथा सर ( बाल रुग्ण तज्ञ), डॉ. अर्चना उंबरकर(बालरुग्ण तज्ञ ) डॉ कोथळकर मॅडम, डॉ.ज्योती वाघ, डॉठाकरे मॅडम,डॉमहेशगोरे, डॉजयजोमाळकर, डॉ. अंजू वर्गीस, डॉ ज्ञानेश्वर राऊत आदी लोक उपस्थीत होते. कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे आयोजन वॉर्ड मधील कर्मचारी वार्ड इन्चार्ज माधुरी मोरे, सुजाता राजपूत, आशा भालेराव तसेच वॉर्ड च्या अधिपरीचारीका, प्रियंका निंबाळकर विजया पवार, ममता डोंगरदिवे, सुनिता लहासे,सुश्मा घोलप, दिपाली सुसर, रिबेका तोडे, अर्चना चराटे तसेच आहारतज्ञ, तृप्ती ठाकरे, सोळंकी सर, तसेच वार्ड कर्मचारी रंजना आराख सुलभा मोरे पूजा वानखडे व शंकर बेंडवाल सुरज चव्हाण यांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती गठीत...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुलढाणा जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील हे अध्यक्ष म्हणून कार्यरत राहणार आहेत. तसेच बुलढाणाचे उपविभागीय अधिकारी, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, दैनिक दिव्य मराठीचे जिल्हा प्रतिनिधी लक्ष्मीकांत बगाडे, साम टिव्हीचे जिल्हा प्रतिनिधी संजय जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे प्रदेश प्रतिनिधी गणेश निकम, डिजीटल मिडीया परिषदेचे अध्यक्ष गणेश सोळंकी हे या समितीचे सदस्य म्हणून कार्यरत राहणार आहेत. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड हे या समितीचे सदस्य सचिव म्हणून कार्यरत राहणार आहेत.

# एचआयव्ही जनजागृतीसाठी तालुकास्तरावर प्रशिक्षण



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात एचआयव्ही,एड्स प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी कार्यरत विविध यंत्रणांची कार्यक्षमता वाढवून समन्वयितपणे जनजागृती वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार तालुकास्तरावर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार असून, सर्व विभागांनी एकत्रितपणे या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी केले. एचआयव्ही एड्स नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत आंतर विभागीय बैठक जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या दालनात संपन्न झाली. यावेळी औषध व अन्न प्रशासन सहायक आयुक्त गजानन घिरके, गटविकास अधिकारी एस.डी. तायडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रविण घोंगटे,जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रमोद टाले, वैद्यकीय अधिकारी डॉ. सरोज छबीले, डॉ.डि. व्ही. खिरोडकर, एस.बी. साखळीकर, गजानन देशमुख, वैशाली इंगळे, मंगला उमाळे आदी उपस्थित होते. जिल्ह्यात एचआयव्ही संसर्गित रुग्णांच्या उपचारात सातत्य, समुपदेशन आणि उपलब्ध सुविधांमुळे एड्समुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत घट झाली असून ही समाधानाची बाब आहे. पुढील काळातही संसर्ग रोखण्यासाठी शिबिरे, समुपदेशन तसेच युवकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी सर्व महाविद्यालयांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या रेड रिबन क्लबच्या माध्यमातून संवाद वाढवण्यासाठी प्रयत्न करावे. तसेच एड्स संसर्गाचा दर शून्यापर्यंत आणण्यासाठी सर्व विभागाने सहभाग घेण्याचे आवाहन जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रमोद टाले यांनी दिली. एचआयव्ही एड्स प्रतिबंध व नियंत्रण कायदा, २०१७ नुसार एचआयव्ही संक्रमित व्यक्तींविरुद्ध भेदभाव करणे हा कायद्याने दंडनीय अपराध असून या कायद्याची जनसामान्यपर्यंत जनजागृती करावी. तसेच एचआयव्ही रुग्णांना उपचारास नकार देणे, भेदभाव करणे, कलंकित करणे, अयोग्य वक्तव्य करणे अशा कोणत्याही प्रकारांवर संबंधित व्यक्ती, संस्था किंवा रुग्णालयांवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल असे स्पष्ट करण्यात आले.

# बुलडाणा सायबर पोलीसांची मोठी कामगिरी...

## डिजिटल अरेस्टफ फसवणूक प्रकरणातील १० लाखांपैकी ९.१४ लाख रुपये परत

**जनसंचलन/बुलढाणा**



सायबर गुन्ह्यातील अत्यंत गंभीर समजल्या जाणाऱ्या डिजीटल अरेस्ट स्वरूपातील फसवणूक प्रकरणात बुलडाणा सायबर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने मोठी कामगिरी बजावली आहे. तक्रारदार विनोदकुमार उत्तमराव साळोक (वय ४२) आणि त्यांची पत्नी यांना खोट्या सीबीआय व ट्राई विभागाच्या नावाने धमकी देत त्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे खोटे आरोप लावून १० लाख रुपये ऑनलाईन भरावयास लावून फसवणूक करण्यात आली होती.

तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, दि. २० ते २४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत अज्ञात व्यक्तींनी व्हॉट्सअॅप कॉलद्वारे डिजीटल अरेस्टची भीती दाखवून एक्सीस बँक मधील ग्लोबल टिंबर्स नावाच्या खात्यात आरटीजीएसद्वारे १० लाख रुपये जमा करण्यास भाग पाडले. यावरून दि. २५ ऑगस्ट २०२५ रोजी सायबर पोलीस स्टेशन, बुलडाणा येथे अप.नं.४१/२०२५ कलम २०४.२०५.३१८२) ३१८(४),३१९(२),३३६(३),३४०(२)भा. न्या. संहीता २०२३ सहकलम ६६ ().६७ () प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला.

तक्रार प्राप्त होताच पोलीस निरीक्षक संग्राम पाटील यांनी तातडीने संबंधित बँकांना पत्रव्यवहार करून आरोपींच्या खात्यांची तांत्रिक तपासणी सुरू केली. फसवणूक केलेले पैसे विविध खात्यांत वळविण्यात आले असल्याचे समोर आले. तपास पथकाने त्वरित ही सर्व खाती गोठविण्याची () प्रक्रिया केली. तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपींनी वळवलेली तक्रारदारांची रक्कम मिझोरम राज्यातील एका बँक खात्यात गेल्याचे निदर्शनास आले. तत्काळ कारवाई करत त्या खात्यातील तब्बल ९ लाख ९४ हजार ३०० रुपये रक्कम गोठवून न्यायालयाच्या आदेशानुसार ती तक्रारदारांच्या बँक खात्यात दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी यशस्वीरित्या परत मिळवून देण्यात आली.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रकाश सदगर, तपास अधिकारी पो. नि. संग्राम पाटील, सपोनि प्रमोद इंगळे, पोहेकॉ रामेश्वर मुंढे, प्रशांत गावंडे, राहुल इंगळे आणि केशव पुढे यांच्या पथकाने केली.

# साखरखेर्डा गट महिलांसाठी राखीव, अनेकांनी केली दावेदारी; नेत्यांचा उमेदवारी देताना लागणार कस !

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

साखरखेर्डा जिल्हा परिषद गट सर्वसाधारण महिला राखीव झाल्यामुळे सहा प्रमुख पक्षांकडून दावेदारीचे नवे गणित तयार झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), राष्ट्रवादी (अजित पवार), शिंदेसेना, उद्धवसेना, काँग्रेस आणि भाजप या सर्व पक्षांकडून अनेक इच्छुक महिलांची नावे पुढे आल्याने अंतिम उमेदवार कोण ठरणार, याकडे लक्ष लागले आहे. निर्णय आता पक्षश्रेष्ठींवर अवलंबून आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाकडून रेखाताई जाधव, उद्धवसेनेतून माजी सदस्य स्नेहल पाटील यांचे नाव चर्चेत आहे. काँग्रेसकडून माजी सरपंच संगीता रिंढे यांच्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भाजप प्रदेश सदस्य उल्हास देशपांडे यांनी नीता देशपांडे यांच्या उमेदवारीसाठी हालचाली वाढवल्या आहेत. राष्ट्रवादी (अजित पवार) गटात सुजाता पोंधे व सुमनताई जगताप हे पर्याय आहेत. तर शिंदेसेनेत जयश्री खेडेकर, अमृता जाधव, प्रजावती मोरे आणि सुलभा देशमुख या चार दावेदार पुढे आल्या आहेत. स्थानिक स्तरावर बसस्थानकाची दुरवस्था, महिलांसाठीस्वच्छतागृहांची




कमतरता आणि इतर नागरी प्रश्न ऐरणीवर असताना अनेक दावेदार केवळ उमेदवारी मागण्यापुरतेच सक्रिय आहेत, अशी मतदारांमध्ये चर्चा आहे. स्थानिक कार्यकर्त्यांमध्येही स्थानिक उमेदवाराबाबत अपेक्षा वाढल्या आहेत. शिंदेसेनेत अंतर्गत मतभेद, तर भाजपसोबत युती न झाल्यास स्वतंत्र लढतीची शक्यता व्यक्त केली जात आहे. महाविकास आघाडीकडून मात्र युतीसाठीचा प्रयत्न दिसत असून, प्रतिस्पर्ध्यांना थोपवण्यासाठी एकत्र लढणे आवश्यक असल्याचे चित्र आहे. या गटात डॉ. राजेंद्र शिंगणे यांचे वर्चस्व असून, ते गट आपल्या बाजूला ठेवण्यासाठी सक्रिय आहेत. विधानसभा निवडणुकीतील मताधिक्यामुळे डॉ. शशिकांत खेडेकर, जयश्री खेडेकर यांना पुढे आणण्यास इच्छुक आहेत. दरम्यान, खासदार प्रतापराव जाधव यांचे पुतणे योगेश जाधवही अमृता जाधव यांच्या उमेदवारीसाठी प्रयत्न करत असल्याने स्पर्धा आणखी चुरशीची बनली आहे.

# ट्रॅक्टरची चोरी करणाऱ्या दोघांना अटक

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव-अकोला रोडवरील एका दुकानासमोरून ३० मे रोजी चोरीला गेलेल्या ट्रॅक्टर प्रकरणाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे.

शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील तपासादरम्यान पोलिसांनी भूषण श्रीकृष्ण ठाकरे (वय २४, रा. अनकवाडी, ता. अकोला) आणि वैभव उर्फ छकुला बाबुजी आठवले (वय २७, रा. कपिलेश्वर, ता. अकोला) या दोघांना ११ नोव्हेंबर रोजी अटक केली. आरोपींकडून एमएच २८ एझेड ९१८७ क्रमांकाचा २ लाख २५ हजार किमतीचा ट्रॅक्टर जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी या चोरीचा छडा लावून गुन्हा उकल केला.

# नगर परिषद बुलढाणा सार्वत्रिक निवडणूक २०२५

## जाहीर सूचना

**संदर्भ मा.जिल्हाधिकारी यांचे आदेश जा.क्र.न.वि.शा./डे-५/३३५२/२०२५ दिनांक १३/११/२०२५**

नगरपरिषद बुलढाणा सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रभाग क्र.१० मधील मतदार क्रेंद वरील संदर्भीय आदेशानुसार पुढीलप्रमाणे अंतिम करण्यात आलेले आहेत तरी सर्व मतदारांनी याची नोंद घ्यावी.

| प्रभाग क्र. | मतदान केंद्र क्र. | मतदान केंद्राचे निश्चित स्थान |
|---|---|---|
| १० | १०/१ | श्री.सरस्वती उच्च प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा, वर्ग ३ची खोली, विष्णूवाडी. |
| | १०/२ | श्री.सरस्वती उच्च प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा, वर्ग ४ ची खोली, विष्णूवाडी. |
| | १०/३ | श्री.सरस्वती उच्च प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा, वर्ग ६ची खोली, विष्णूवाडी |
| | १०/४ | मुकबधीर विद्यालय, खोली क्र.२ |

**दिनांक :** १४/११/२०२५
**ठिकाण :** बुलढाणा

**स्वाक्षरी**
(डॉ.जयश्री काटकर-बोराडे)
सहायक निवडणूक निर्णय अधिकारी
नगरपरिषद बुलढाणा सार्वत्रिक निवडणूक २०२५

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८